ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १७ पुणें, बुधवार तारीख ११ जुलै, १९५१ अंक २८

## विविध माहिती

**कुटुंब-नियोजन**—गेल्या कांहीं आठवड्यांत भारताचे पंतप्रधान पं. नेहरू ह्यांनीं वाढत्या लोकसंख्येच्या नियोजनाचा उल्लेख आपल्या भाषणांतून केला आहे. भारत सरकारचें नियोजनमंडळ ह्या प्रश्नाचा विचार करीत असून कुटुंब-नियोजनाची एक योजना तें तयार करीत आहे असें समजतें. योजनेचा तपशीलवार विचार सध्या चालू आहे.

**हत्तींच्या निर्यातीवर बंधन**—भारत सरकारनें दरवर्षी ७५ हत्तींच्या निर्यातीलाच परवानगी देण्याचें ठरविलें आहे, असें समजतें. ज्या देशोकडून ज्या अनुक्रमानें मागणी येईल त्या अनुक्रमानें ती पुरविण्यांत येईल. निर्यातीच्या नियमांत पाकिस्तानचाहि समावेश करण्यांत आला आहे. भारतांत दरवर्षी सुमारें २०० जंगली हत्तींना पकडण्यांत येतें.

**चितोडजवळ चुनखडीचा दगड**—राजस्थानमधील चितोड भागांत चुनखडीचा दगड मोठ्या प्रमाणावर सांपडला आहे. जवळ जवळ २५ चौरस मैल प्रदेशांवर ह्या खाणी पसरलेल्या आहेत. चुनखडीचा दगड सिमेंटच्या उत्पादनाला लागतो. ह्या खाणींचा उपयोग करून दरवर्षी १,००० टन सिमेंट उत्पन्न करणारा कारखाना ह्या भागांत काढतां येण्यासारखा आहे.

**खेळाच्या सामानाच्या धंद्याला स्पर्धा**—खेळांना लागणाऱ्या सामानाचें उत्पादन करण्यांत हॉलंडनें बरीच आघाडी मारली असून त्यामुळें हॉलंडला आतां परदेशांतून ह्या साहित्याची आयात करावी लागणार नाहीं. टेनिसच्या रॅकेट्स, बॅडमिंटनच्या रॅकेट्स, कातड्याचे व रबराचे बूट, हॉकीच्या काठ्या इत्यादि साहित्य आतां त्या देशांत मोठ्या प्रमाणावर तयार होऊं लागलें आहे.

**संयुक्त-प्रांतांतील ग्रामोद्योग**—संयुक्त प्रांतांतील ग्रामोद्योगांचा विस्तार करण्याची एक योजना आंखण्यांत आली आहे. ग्रामोद्योगांच्या उत्पादनाची पद्धत सुधारणें, त्यांतील कामगारांची सहकारी संस्थांत संघटना करणें, मालाचा दर्जा एकसारखा राखणें, उत्पादन वाढविणें, आणि मालाच्या विक्रीची व्यवस्था करणें, इत्यादि हेतूनें ही पुनर्घटना करण्यांत आली आहे.

**घटनेंतील हक्क व सवलती**— भारताच्या नागरिकांना हिंदी घटनेप्रमाणें देण्यांत आलेल्या हक्कांचा व सवलतींचा बोध करून देणारे दोन हिंदी चित्रपट तयार करण्यांत आले आहेत. ह्या चित्रपटांच्या पंजाबी भाषेंत आवृत्त्या काढण्याचा विचार पंजाब सरकार करीत आहे असें समजतें.

**रोलेक्स वॉच कंपनी**—जिनिव्हा येथील रोलेक्स वॉच कंपनीच्या स्थापनेला ५० वर्षें नुकतींच पूर्ण झालीं. ही कंपनी पाण्याला दाद न देणारीं आणि आपोआप किल्ली दिलीं जाणारीं घड्याळें करण्यांत पहिली होती. कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर मि. हॅन्स विल्सडॉर्फ ह्यांचा ७० वा वाढदिवसहि साजरा करण्यांत आला. त्यांनीं आपल्या वयाच्या २० व्या वर्षी शिकाऊ कामगार म्हणून धंद्यांत प्रवेश केला होता. १९२७ सालीं कंपनीचें रिस्ट वॉच हातांत घालून लंडनमधील एका स्त्री लघुलेखिकेनें इंग्लिश खाडी ओलांडली. त्यावेळेपासून कंपनीच्या घड्याळांविषयीं जगाची खात्री पटली.

**आंब्याच्या कोयींचा उपयोग**—"आंब्याच्या कोयींतील गाभ्यांत पिष्टमय पदार्थ, चरबी आणि कॅल्शियम असल्यामुळें आहारांत त्याचा उपयोग करण्यास मुळींच हरकत नाहीं." असें भारतीय शेती-संशोधन खात्यातर्फे जाहीर करण्यात आलें आहे. अन्नधान्याची टंचाई ह्या पूरक अन्नानें अंशतः भरून काढतां येण्यासारखी आहे.

**गांधीजींचें चित्रमय चरित्र**—महात्मा गांधींचें चित्रमय चरित्र दोन खंडांत प्रसिद्ध करण्याची एक योजना आंखण्यांत आली आहे. चरित्राची जुळवा-जुळव करण्यासाठीं २॥ वर्षें खटपट करावी लागली. जगाच्या निरनिराळ्या भागांतून महात्माजींचीं ६०० चित्रें मिळविण्यांत आलीं असून श्री. काकासाहेब कालेलकर ह्यांनीं ५,००० शब्दांत महात्माजींचें चरित्र-सार सांगितलें आहे. पुस्तक प्रसिद्ध होण्यास एक वर्ष लागेल.

**बिहारच्या विकास योजना**—बिहारच्या युद्धोत्तर पंचवार्षिक कार्यक्रमाला भारताच्या नियोजन-मंडळानें मंजुरी दिली आहे. ह्या कार्यक्रमाचे पांच भाग पाडण्यांत आले आहेत. शेती व ग्रामविकासावर १६७० लाख रुपये, पाटबंधारे व वीज ह्यांच्यावर १,५२३ लाख रुपये, रस्त्यांवर ८०० लाख रुपये, सामाजिक सुखसोयींवर १४५० लाख रुपये आणि उद्योगधंद्यांवर ११९ लाख रुपये खर्च होणार आहेत. एकूण भांडवली खर्च सुमारें ६५ कोटी रुपये होईल.

**काश्मीरची बिहारला मदत**— बिहारमधील दुष्काळग्रस्तांना मदत करण्यासाठी काश्मीरच्या सरकारनें ३३,००० रुपयांचा चेक भारताचे पंतप्रधान पं. नेहरू ह्यांच्या स्वाधीन केला. बिहारमधील दुष्काळी भागांतील गरीब लोकांसाठी वरील रकमेचा उपयोग करण्यांत येणार आहे.

## भारताचे रेडिओ टेलिग्राफ-द्वारें दळणवळण

जूनच्या १८ तारखेपासून नवी दिल्ली आणि मास्को ह्या दोन शहरांच्या दरम्यान रेडिओ-टेलिग्राफचें दळणवळण सुरू करण्यांत आलें. त्या दिवशीं दोन्ही राजधान्यांतील अधिकाऱ्यांनीं एकमेकांशीं प्रत्यक्ष बातचीत केली. ह्यापूर्वी मॉस्कोशीं बोलण्यासाठी लंडनचें माध्यम वापरावें लागे. दोन्ही देशांना परस्परांशीं लवकर संबंध जोडण्यांत यावा म्हणून ही योजना अंमलांत आणण्यांत आली आहे. मॉस्कोशिवाय लंडन, मेलबोर्न, शांघाय, टोकिओ, न्यूयॉर्क, काबूल आणि खाटमांडू इतक्या परकीय शहरांशीं रेडिओ टेलिग्राफद्वारां दळणवळण ठेवतां येतें. मॉस्कोला संदेश पाठविण्याचा मामुली दर दर शब्दामागें १ रु. १ आणा असा ठेवण्यांत आला आहे. लेटर टेलिग्राम्सचा दर ८ आणे ६ पै असा आहे. संदेश पाठविण्याच्या वेळा रात्रौ २ ते ४, सकाळीं ११-३० ते दुपारीं १-३० आणि संध्याकाळीं ५-३० ते ७-३० अशा ठेवण्यांत आल्या आहेत. इजिप्त आणि इराण ह्यांच्याशींहि असेंच दळणवळण ठेवण्यासंबंधीं सध्या विचार चालू आहे. त्यासाठी जरूर असणारी तांत्रिक तपासणी पूर्ण झाली आहे. ओव्हरसीज कम्युनिकेशन्स सर्व्हिसेस ह्या संस्थेतर्फे भारताला इजिप्तशीं दळणवळण ठेवण्याची व्यवस्था करण्यांत येणार आहे. अजून नक्की तारीख ठरलेली नाहीं. असें दळणवळण सुरू झाल्यावर सुद्धां कांहीं दिवस फक्त १ तासच संदेश धाडण्यांत येतील. कारण, अधिक प्रमाणांत दळणवळण ठेवण्यासाठी जरूर असलेली सामुग्री अद्याप तयार नाहीं.

---

**मध्यवर्ती सरकारकडून मिळालेलें धान्य**— ता. २२ जून १९५१ रोजीं संपलेल्या आठवड्यांत भारत-सरकारनें तुटीच्या प्रांतांना १,१३,००० टन अन्नधान्य पाठविलें. त्यापैकीं मुंबई प्रांताला ३०,७०० टन, बिहारला ३०,००० टन, मद्रासला १९,३५० टन, प. बंगालला १०,४०० टन, त्रावणकोर-कोचीनला ८,००० टन आणि इतर भागांना १३,८५० टन धान्य पाठविण्यांत आलें.

**दारूबंदीमुळें होणारें नुकसान**—त्रावणकोर-कोचीनच्या ३६ जिल्ह्यांपैकीं १३ जिल्ह्यांत सध्या दारूबंदी करण्यांत आली आहे. त्यामुळें अबकारी उत्पन्नांत ७८ लाख रुपयांची घट झाली आहे, असें जाहीर करण्यांत आलें आहे. दारूबंदीमुळें जे लोक बेकार झाले त्यांना ताडगुळाच्या धंद्यांत काम देण्यांत आलें अगर सरकारी मालकीच्या जमिनीवर त्यांची वसाहत करण्यांत आली.

**क्रिकेटच्या संघाच्या दौऱ्याचा विमा**—पुढील उन्हाळ्यांत वेस्ट इंडिजहून एक क्रिकेट संघ ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यावर जाणार आहे. युद्धाच्या जोखमीपासून संरक्षण मिळविण्यासाठी ह्या संघाच्या दौऱ्याचा ६,४०० पौंड किंमतीचा विमा उतरण्यांत आला आहे. युद्धामुळें दौरा न झाल्यास ऑस्ट्रेलियन बोर्ड वेस्ट इंडीज बोर्डाला ६,४०० पौंड देण्यास बांधला गेला आहे. हा विमा सिडने येथील दुसरा कसोटीचा सामना होईपर्यंत चालू रहाणार आहे.

**जपानची युद्धोत्तर प्रगति**—जपाननें युद्धोत्तर कालांतील सर्वांत अधिक उत्पादन गेल्या मे महिन्यांत केलें असें समजतें. १९२८ साली जपानचें जेवढें औद्योगिक उत्पादन होतें तेवढें आतां होऊं लागलें आहे. १९४३ साली जपाननें पोलादाच्या उत्पादनाचें शिखर गांठलें होतें. आतां युद्धकाळांतील ह्या उत्पादनाच्या १५ टक्के पोलाद पुन्हां निर्माण होऊं लागलें आहे. इतर औद्योगिक मालहि युद्धोत्तर काळाइतका तयार होऊं लागला आहे.


दि
# युनायटेड कमर्शिअल बँक लि.

कलकत्ता.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | ८ कोटी रु. |
| खपलेलें भांडवल | ... | ४ कोटी रु. |
| वसूल भांडवल | ... | २ कोटी रु. |
| रिझर्व्ह फंड | ... | ६० लक्ष रु. |

: बोर्ड ऑफ डायरेक्टर्स :

जी. डी. बिर्ला ( चेअरमन )

| | |
|---|---|
| ईश्वरीप्रसाद गोएंका<br>व्हाइस चेअरमन | रमणलाल जी. सरय्या<br>व्हाइस चेअरमन |
| अनंत चरण लॉ | महादेव एल. डहाणूकर |
| बैजनाथ जालन | मदनमोहन आर. रुइया |
| गोविंदलाल बंगूर | मोहनलाल एल. शहा |
| पी. डी. हिमतसिंगका | मोतिलाल तापुरिया |
| रामेश्वरलाल नोपानी | नवीनचंद्र मफतलाल |

: जनरल मॅनेजर :

बी. टी. ठाकूर

भारत, बर्मा, पाकिस्तान आणि मलाया येथील महत्त्वाच्या शहरीं व गांवीं बँकेच्या शाखा असल्यानें आणि बँकेच्या सबंध जगभर एजन्सीच्या व्यवस्था असल्यानें भारतांत व भारताबाहेर अत्युत्कृष्ट बँकिंगची सेवा करण्यास बँक सुसज्ज आहे.







# अर्थ

बुधवार, ता. ११ जुलै, १९५१



संस्थापक : प्रो. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे


## बँकांची रोख्यांतील गुंतवणूक

शेड्यूल्ड बँकांच्या सरकारी रोख्यांतील गुंतवणुकीची पहाणी रिझर्व्ह बँकेनें १९४५ ते ४८ दरसाल डिसेंबर अखेर केली. १९४९ चा बँकिंग कंपन्यांचा कायदा अंमलांत आल्यावर ही पहाणी सहामाही करण्यांत आली आणि कांहीं नमुनेवजा बिगर–शेड्यूल्ड बँकांचाहि तपशील जमविण्यांत आला. गुंतवणुकीचे इतरहि प्रकार पहाणींत समाविष्ट करण्यांत आले. डिसेंबर १९४८ अखेरचे, जून १९४९ अखेरचे व डिसेंबर १९४९ अखेरचे आंकडे विचारांत घेऊन त्यांचा निष्कर्ष रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया बुलेटीनच्या ताज्या अंकांत प्रसिद्ध करण्यांत आला आहे. त्यावरून असें दिसतें, कीं शेड्यूल्ड बँकांच्या एकूण इन्व्हेस्टमेंटपैकीं ८९% हिंदी सरकारी रोख्यांत होती आणि त्यापैकीं नऊ–दशांश रोखे मध्यवर्ती सरकाराचे होते. इतर रोख्यांत कंपन्यांचे शेअर्स व डिबेंचर्स ह्यांचाच भरणा होता आणि त्यांतहि मोठा भाग औद्योगिक शेअर्सचा होता. परदेशी इन्व्हेस्टमेंट १९४९ मध्यें झपाट्यानें कमी होत गेली.

१९४५ ते ४८ ह्या मुदतींत शेड्यूल्ड बँकांची सरकारी रोख्यांतील गुंतवणूक उतरत गेली. १९४९ मध्यें आणखी ९२ कोटींचे रोखे कमी होऊन त्या वर्षअखेर शेड्यूल्ड बँकांचे फक्त ३५७ कोटी रुपये सरकारी रोख्यांत उरले. दीर्घ मुदतीच्या रोख्यांतील गुंतवणुकीचें प्रमाण कमी होत जाऊन त्या प्रमाणांत अल्प मुदतीच्या रोख्यांचें प्रमाण वाढलें आहे. सर्व शेड्यूल्ड बँकांनीं सरकारी रोख्यांत जेवढी रक्कम गुंतवलेली आहे, त्यापैकीं ७०% रक्कम नऊ प्रमुख शेड्यूल्ड बँकांनीं गुंतविलेली आहे. ह्यावरून त्यांचें प्रस्थ लक्षांत येईल. मोठ्या बँकांचे मानानें लहान बँका दीर्घ मुदतीच्या रोख्यांत जास्त प्रमाणांत रक्कम गुंतवितात असें पहाणींत आढळून आलें. रिझर्व्ह बँक, जॉइंट स्टॉक बँका व सहकारी बँका ह्यांनीं मिळून ५७५ कोटी रुपयांचे रोखे १९४९ अखेर धारण केलेले होते. म्हणजे, एकूण सरकारी रुपयांतील रोख्यांपैकीं ४०% रोखे ह्या बँकांच्या हातांत होते. शेड्यूल्ड व बिगर शेड्यूल्ड अशा सर्व बँकांनीं मिळून जेवढी रक्कम सरकारी रोख्यांत गुंतविली, तिच्या फक्त ३% रक्कम बिगर शेड्यूल्ड बँकांची होती.

### भारत सरकारच्या रुपयांतील कर्जाचे घेणेकरी

| | कर्जाची रक्कम (कोटी रु.) | एकूण रकमेशीं प्रमाण % |
|---|---|---|
| रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया | २,१६ | १५ |
| शेड्यूल्ड बँका | | |
| प्रमुख हिंदी | २,३१ | १६ |
| इतर हिंदी | ५० | ३ |
| एक्सचेंज | ४१ | ३ |
| बिगर शेड्यूल्ड बँका | १० | १ |
| सहकारी बँका | २७ | २ |
| विमा कंपन्या | १,१३ | ८ |
| "अ" भागराज्यें (अंदाज) | ७५ | ५ |
| "ब" भागराज्यें (अंदाज) | १०० | ७ |
| इतरांचे वतीनें, रिझर्व्ह बँकेच्या नावें | १,८३ | १३ |
| परदेशीय लोक (जून, १९४८ अखेर) | ५० | ३ |
| इतर ( उरलेले ) | ३,४१ | २४ |
| एकूण | १४,३७ | १०० |

भारत सरकारच्या एकूण ' रुपी लोन्स ' पैकीं २,१६ कोटी + १,८३ कोटी = ३९९ कोटी रुपयांचे रोखे म्हणजे एकूण रोख्यांपैकीं १४% + १३% = २७% किंमतीचे रोखे रिझर्व्ह बँकेच्या दप्तरांतच होते, आणि विमाकंपन्या १,१३ कोटींचे (८%) रोखे धारण करीत होत्या.

### घाऊक किंमतींचा निर्देशांक

भारतांतील घाऊक किंमतांचा निर्देशांक ( मूळ प्रमाण : ऑगस्ट १९३९ ला संपलेलें वर्ष= १०० ) ९३ जून १९५१ ला संपलेल्या आठवड्यांत आणखी ०·८ टक्क्यानें उतरून ४५४·४ वर आला. मागील वर्षीतील व मागील महिन्यांतील या आठवड्याच्या निर्देशांकाशीं तुलना करतां तो अनुक्रमें १४·४ टक्क्यांनीं जास्त व ०·८ टक्क्यानें कमी आहे.

पुनर्विलोकनाच्या या आठवड्यांत ' अन्नपदार्थ ' गटांतील पाटणा येथील तांदूळ (–३ टक्के ), डाळ (–४ टक्के ) व मीठ (–५ टक्के ) यांच्या किंमती उतरल्यामुळें त्याचा निर्देशांक १·२ टक्क्यानें कमी होऊन ४०९·८ वर आला.

' औद्योगिक कच्चा माल ' गटांतील अशुद्ध मँगनिझ (+१३ टक्के ), लाख ( + ५ टक्के ), कच्चें रेशीम ( + २ टक्के ) व कपास ( + १ टक्का ) यांच्या किंमतींत वाढ झाली असली तरी कच्चा ताग ( –११ टक्के ), शिरस ( –५ टक्के ), एरंडी ( – ४ टक्के ), कच्चीं कातडीं व चामडीं ( प्रत्येकीं – २ टक्के ), तीळ व खोबरें ( प्रत्येकीं – १ टक्का ) यांच्या किंमतींत घट झाल्यामुळें या गटाचा निर्देशांक २·५ टक्क्यांनीं उतरून ६८१·३ वर आला.

'अर्ध–पक्का माल' गटांतील खोबऱ्याची पेंड ( + १७ टक्के ) व भुइमुगाची पेंड ( + ५ ) टक्के यांच्या किंमतींत वाढ झाल्यामुळें त्यांच्या निर्देशांकांत ०·२ टक्क्यांची वाढ होऊन तो ३८९·८ वर गेला.

कांचेच्या किंमतींत १३ टक्क्यांची घट झाल्यामुळें 'पक्का माल' गटाच्या निर्देशांकांत किंचित घट होऊन तो ४०८·३ वर आला.

' संकीर्ण वस्तू ' गटांतलि सुपारी ( + ३ टक्के ) व मसाल्याचे पदार्थ ( + १ टक्का ) यांच्या किंमतींत वाढ झाल्यामुळें त्यांच्या निर्देशांकांत ०·५ टक्क्यांची वाढ होऊन तो ७२६·१ वर गेला.

## व्यापारी–कारखानदारांपुढील प्रचलित प्रश्न

( श्री. गो. ग. दांडेकर, मराठा चेंबरचे अध्यक्ष )

सरकार व्यापार–उदिमाच्या अडीअडचणींचा परिहार करण्यासाठीं जें कांहीं करणें शक्य असेल तें करीलच; परंतु राष्ट्र-सेवक व्यापारी–उद्‌मी या नात्यानें आपण आपल्या समाजासंबंधींचें व मायभूमीसंबंधींचें आपलें कर्तव्य पार पाडलें पाहिजे. सरकारकडे आपण मदत मागावी हें ठीक. पण आपणहि आपल्या पायावर उभें राहिलें पाहिजे व प्रतिकूल परिस्थितीवर मात केली पाहिजे. असें आपण केलें तरच समाजाचा एक उपयुक्त घटक या नात्यानें जगण्याचा आपणांस हक्क राहील. स्वतंत्र भारताचा आर्थिक पाया दृढ करण्याचें भाग्य आपणांस लाभलें आहे. स्वातंत्र्याबरोबर आपणांवर जबाबदाऱ्याहि पडल्या आहेत. व्यापार–उद्‌मी लोकांनीं आपल्या व्यवहारांतून काळा बाजार व गैरवाजवी बाबी यांचें उच्चाटन केलें पाहिजे. कामगार पुढाऱ्यांनीं कामगारांना अशी जाणीव उत्पन्न करून दिली पाहिजे कीं अंतीं आपलें वेतन तेच मिळवीत असतात. सुखसोयी अगत्य मागून घ्या, पण त्या पुरविण्याची कुवत सरकार व मालक यांच्यांत आणण्यास साहाय्यभूत व्हा. कामगार शिस्तीनें, कर्तव्यबुद्धीनें व जबाबदारीनें वागतील तरच तें शक्य होईल.

### प्राप्ती कराची सवलत

उद्योगधंद्यांना संरक्षण देण्यासाठी कायम टॅरिफ कमिशन नेमण्याचें सरकारनें ठरविल्यामुळें लोकांची फार दिवसांची एक मागणी पुरी होणार आहे. उद्योगधंद्यांना संरक्षण देण्याचे जे विविध मार्ग आहेत, त्यांत परदेशी मालाच्या आयातीवर परिमाण निर्बंध घालण्याच्या पद्धतीचाहि अंतर्भाव सरकारनें केला पाहिजे. तसेंच सध्यांच्या नियंत्रणाचे काळांत कंपनी रजिस्टर झाल्यापासून कारखाना निघून पुरेसें उत्पादन होण्यासच सांप्रत निदान पांच वर्षें लागतात असा अनुभव आहे. म्हणून नवीन धंदे निघण्यास उत्तेजन म्हणून सरकारनें प्राप्तीकराच्या सवलतीची मुदत सध्यां जी पांच वर्षें ठेविली आहे ती दहा वर्षें करावी.

उद्योगधंद्यांचें विकेंद्रीकरण होऊन देशाच्या अंतर्गत भागांत लहानसहान धंदे निघण्यास उत्तेजन म्हणून सरकारनें अशा धंद्यांना करविषयक विशेष सवलती द्याव्यात व ग्रामीण भागांतील परिस्थिति शहरांहून भिन्न असल्यानें कामगारविषयक कायद्यांचा आवश्यक तेवढाच भाग त्यांना लागू करावा.

### कारखाना–कारखान्यांतील भेद काढून टाका

देशांतील कारखान्यांना आजच पिग आयर्नचा फारच तुटवडा भासत आहे. सबब पिग आयर्नचें उत्पादन सरकारनें वाढवावें व शक्यतोंवर त्याची परदेशांत निर्गत होऊं देऊं नये. शेतीचा कच्चा माल सतत निर्माण होऊं शकतो पण खनिज संपत्तीचें मात्र तसें नाहीं. तिचा भूगर्भांतील सांठा मर्यादितच असतो याकडेहि लक्ष देणें आवश्यक आहे. सांप्रत पिग आयर्न, कोक, लोखंड व पोलाद यांचें वांटप करतांना जुलै, १९४० पूर्वीच्या कारखानदारांना नियमित वांटा दिला जातो. पण त्यानंतर निघालेल्या कारखान्यांना ता निश्चित व नियमित मिळत नाहीं. युद्ध संपून आतां पांच वर्षें होऊन गेल्यानें हा भेद आतां काढून टाकावा व सर्वच विद्यमान कारखाने व फौंड्रीज यांच्या गरजा, त्यांचें उत्पादन व उत्पादनशक्ति यांची पहाणी करून वाजवी वांटप पुन्हा ठरविलें जावें.

### यंत्रमाग कापडाच्या किंमती

विणकरांना सांप्रत भासणारी सुताची वाण तात्पुरती नसून मूलभूत आहे व त्यावर उपाय म्हणून नवीन सूतकताईच्या गिरण्या निघण्यास व चालू गिरण्यांना उत्पादन वाढविण्यास उत्तेजन मिळावें म्हणून त्यांचें जादा उत्पादन परस्पर गिऱ्हाइकांना ठरलेल्या किरकोळीच्या दरानें विकण्यास सरकारनें मुभा द्यावी. असें केल्यानें गिऱ्हाइकांवर जादा बोजा पडणार नाहीं व गिरण्यांनाहि उत्तेजन मिळेल. मुंबई सरकारनें सांप्रत लहान सूत–गिरण्यांना दिलेल्या सवलती, त्यांची मुदत भरली असल्यानें, पुढेंहि चालू ठेवणें आवश्यक आहे असें आग्रहानें प्रतिपादन केलें. सूत वांटप करतांना यंत्रमागांना ५० नंबरी सूत सुमारें चार पौंड व २० नंबरी सूत किमान साडेसात पौंड लागतें याची दखल सरकारनें घ्यावी. जोंपर्यंत यंत्रमागांना त्यांच्या किमान गरजेइतकें ठराविक नंबराचें सूत सरकार सतत देत नाहीं तोंपर्यंत यंत्रमाग कापडाच्या किंमती नियंत्रित केल्या जाऊं नयेत. मुंबई सरकारच्या विद्यमान नियंत्रित कापड वांटप पद्धतीमुळें किरकोळ कापड–व्यापारी धंद्यांतून उठल्यासारखे आहेत. नियंत्रित भावांत सम प्रमाणांत कापड विकण्याचें बंधन घालून किरकोळ व्यापाऱ्यांचे संघामार्फत किरकोळ कापडविक्री सरकारनें करावी. मात्र सदर संघांना आपली जबाबदारी नीट पार पाडतां यावी यासाठीं, शिस्तभंग करणाऱ्या सदस्यांवर इलाज करण्याचा अधिकार संघांना देण्यांत यावा. रंग तयार करण्याचा धंदा अद्यापि बाल्यावस्थेंत असल्यामुळें व कांहीं जातीच्या रंगांबाबत सांप्रत देश स्वयंपूर्ण होण्याची शक्यता असल्यानें सरकारनें त्या जातींच्या रंगांची आयात नियंत्रित करावी. रंग–कारखानदार वाजवी भावानें आपला माल विकण्याची व मालाची प्रत चांगली ठेवण्याची हमी देण्यास तयार आहेत.

### कोको–चाकोलेट

कोको–चाकोलेट यांचा पुरेसा पुरवठा या देशांत होण्यासारखा असल्यानें सदर माल परदेशांहून आयात होऊं देऊं नये. संरक्षित धंद्यांचे कारखान्यांत तयार होणारा माल हा इतर धंद्यांचा कच्चा मालहि असतो. अशा कारखान्यांना परदेशी चढाओढीस यशस्वीपणें तोंड देतां यावें म्हणून संरक्षित धंद्यांना लागणारा कच्चा माल वाजवी दरानें पुरविण्याची व्यवस्था व्हावी.

इन्कमटॅक्सची आगाऊ मागणी करण्याचा अधिकार प्राप्तीकर अधिकाऱ्यांना दिलेला असल्यानें एका वर्षांत तीन वर्षांचाहि कर भरण्याची पाळी व्यापारी-कारखानदारांवर येते. त्यामुळें अशा व्यापारी–कारखानदारांचा फारच कोंडमारा होतो. प्राथमिक चांचणींत शक्य तितकी जादा कर–आकारणी करण्याची अधिकाऱ्यांची प्रवृत्ति दिसत असल्यानें वरिष्ठांकडे दाद मागण्यासाठीं व्यापारी–उद्‌म्यांचा अकारण वेळ जातो. सरकारनें ही परिस्थिति सुधारावी.

### कंत्राटांतील एकतर्फी अटी

सरकार बांधकामाचीं किंवा मालपुरवठ्याचीं जीं कंत्राटें देतें त्यांतील अटी एकतर्फी व सरकारी अधिकाऱ्यांना निर्णायक अधिकार देणाऱ्या असतात. त्यामुळें लांचलुचपत व गैरवाजवी व्यवसायपद्धति यांस वाव मिळूं शकतो आणि सरकारला आपल्या पैशाचें पुरेपूर मूल्य मिळत नाहीं. सबब खरेदी केलेला माल व करून घेतलेलें बांधकाम यांबाबतची जबाबदारी सरकारी अधिकाऱ्यांवरहि ठेवावी व मतभेदाचे मुद्यांबाबत स्वतंत्र लवादाची तरतूद ठेवावी. असें केल्यास प्रामाणिकपणा व सरळ व्यवहार यांस पूर्ण वाव मिळूं शकेल.

## भारतांतील भुइमुगाची लागवड

### एकूण क्षेत्रांत प्रचंड वाढ

गेल्या चाळीस वर्षांत भुइमुगाची लागवड हा या देशांतील महत्त्वाचा शेती धंदा झाला असून एकूण सर्व गळित धान्यांखालीं असलेल्या देशांतील जमिनीच्या सुमारें ४२ टक्के व अन्नपिकांच्या लागवडीखालील एकूण जमिनीच्या ४.४ टक्के जागा या पिकाखालीं येते. या शतकाच्या सुरवातीला या पिकाची लागवड केवळ ०.५ दशलक्ष एकर जमिनींत होत असे, ती आतां १ कोटी एकरांपर्यंत गेली असून त्यांपासून प्रतिवर्षी ३३ दशलक्ष टन शेंगा व ४.१० दशलक्ष टन दाण्याचें उत्पादन होतें.

१९४८ मधील जगांतील गळितधान्याखालील जमीन व उत्पादनपैकीं भारताचा वांटा अनुक्रमें ३४.५ व ३० टक्के होता. भुइमुगाखाली असलेल्या एकूण जमिनीपैकीं जवळ जवळ ८८ टक्के जमीन मद्रास, मुंबई व हैद्राबादेंत असून सौराष्ट्रांतील तेलाचा कमी अंश असलेल्या भुइमुगाचा खाण्याकडे उपयोग होतो.

### तेल गाळण्याच्या धंद्याची वाढ

दुसऱ्या महायुद्धापर्यंत या मालाच्या बाजारपेठेसाठीं हा देश इतर देशांवर अवलंबून होता. तथापि, युद्धकाळांत या देशांत भुइमुगाचें तेल गाळण्याच्या धंद्यांत आणि भुइमुगाच्या देशांतील वापरांत झपाट्यानें वाढ झाली. गळितधान्याचा या देशांतच वापर करण्याचें युद्धपूर्वकालांतील प्रमाण ६० टक्के होतें, तें १९४८–४९ मध्यें ९८ टक्के झालें. भुइमुगाच्या दाण्याच्या निर्यातींतील घट, युद्धपूर्वकालापेक्षां भुइमुगाच्या तेलाच्या १९४९—५० मधील तिप्पट निर्यातीनें भरून काढण्यांत आली.

तथापि, भुइमुगाच्या दाण्यांचा दरमाणशीं १.८२ रत्तल असा वापर त्यामानानें अजूनहि कमीच आहे. विजेवर चालणाऱ्या तेल गाळण्याच्या गिरण्या व खेड्यांतील तेलाच्या घाणींतून सरासरी ७० टक्के भुइमुगाच्या उत्पादनापासून ७ लाख टन तेल व १०॥ लाख टन पेंड तयार करण्यांत येते. या तेलाचा उपयोग याच स्वरूपांत अगर वनस्पती म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हायड्रोजिनेटेड तेलाच्या स्वरूपांत स्वयंपाकासाठीं करण्यांत येतो. गेल्या १० वर्षांत वनस्पतीच्या धंद्यांत झपाट्यानें वाढ होत असून १९४९ मध्यें १.९५ लाख टन भुईमुगाचें तेल वापरण्यांत आलें. खत म्हणून वापरण्यांत येणाऱ्या भुइमुगाच्या पेंडीच्या निर्यातीस १९४९ पासून बंदी करण्यांत आली आहे.

या देशांतील भुइमुगाच्या धंद्याची व्यवस्था चांगली नसून चुकीच्या पद्धतीनें सुकविलेले आणि निष्काळजीपणें तयार केलेल्या दाण्यांची विक्री व निर्यातहि होते. वापरासाठीं आणि निर्यातीसाठीं तेलाचा एकात्म दर्जा कायम ठेवण्याची आणि निरनिराळ्या पातळींवर हा धंदा काटकसरानें करण्याची आवश्यकता निर्विवाद आहे.

---

**मद्रासला फिरतें पोस्ट ऑफिस**—मद्रास शहरांत लोकांच्या सोयीसाठी एक फिरतें पोस्ट ऑफिस खोलण्यांत येणार आहे. रजिस्टर्ड माल, हवाई पार्सलें व पत्रें सायंकाळीं ५॥ ते रात्रौ ९॥ पर्यंत ह्या पोस्ट ऑफिसांत स्वीकारण्यांत येणार आहेत. त्याचप्रमाणें पोस्टाची तिकिटेंहि विकण्यांत येणार आहेत.

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि. (स्थापना १९१८)
शाखा :
१ दादर
२ माहीम
३ बेळगांव
४ पुणें—सारस्वत कॉलनी, सोमवार पेठ, पुणें.
बचतीच्या विविध योजना
हेड ऑफिस–गिरगांव, मुंबई.

## पश्चिम युरोपांतील देशांचें आर्थिक सहकार्य

मार्शल मदतीमुळें युरोपांतील १८ देशांची परिस्थिति बरीच सुधारली आहे. परंतु अजून संपूर्ण पुनर्घटना साध्य व्हावयाची आहे असें मत युरोपच्या आर्थिक सहकार्यासाठीं स्थापन झालेल्या संघटनेच्या तिसऱ्या अहवालांत नुकतेंच व्यक्त करण्यांत आलें आहे. एप्रिल १९५१ पर्यंत मार्शल योजनेमुळें निरनिराळ्या देशांना ११०० कोटी डॉलर्सची मदत मिळाली. १९४७ शीं तुलना केली असतां मदत मिळणाऱ्या १८ देशांचें उत्पादन १९५० अखेर २५ टक्क्यांनीं वाढलें. औद्योगिक उत्पादनांत ४५ टक्के वाढ झाली व १९३८ च्या मानानें तें एक–तृतीयांशानें वाढलें. शेतीचें उत्पादन १९३८ च्या मानानें १० टक्के वाढलें, परंतु १९४७–४८ च्या मानानें १९५०-५१ या वर्षी शेतीच्या उत्पादनांत चतुर्थांश वाढ झाली. १९४९ च्या किंमतीप्रमाणें मार्शल–योजनेनुसार मदत मिळणाऱ्या देशांची निर्गत १९४७ ते १९५० या काळांत ९१ टक्क्यांनीं वाढली व आयात २२ टक्क्यांनीं वाढली. युद्धपूर्वीच्या वर्षांशीं तुलना करतांना निर्गतींत ३५ टक्के वाढ झाली परंतु आयात मात्र ३ च टक्क्यांनीं वाढली. व्यापारांत झालेल्या या सुधारणेमुळें मार्शल-मदत मिळणाऱ्या देशांना १९५० सालीं फक्त १०० कोटी डॉलर्स तूट आली; परंतु मदत मिळण्यापूर्वी १९४७ सालीं ही तूट ८०० कोटी डॉलर्स होती. याच काळांत डॉलर्समधील तूट ८५० कोटींवरून १०० कोटींपर्यंत उतरली. मार्शल-मदतीमुळें मिळालेल्या ११०० कोटी डॉलर्सच्या मदतीमुळें ही सुधारणा शक्य झाली. या मदतीमुळें एकूण तीन वर्षांत पश्चिम युरोपांतील १८ देशांचें उत्पन्न एकंदर २९०० कोटी डॉलर्सनीं वाढलें.

उत्पादनांत वाढ, अंतर्गत आर्थिक स्थिरता, आर्थिक सहकार्य व डॉलरमध्यें येणारी तूट बंद करणें हे उद्देश १९४७ सालीं पश्चिम युरोपांतील देशांच्या डोळ्यांसमोर होते. या दृष्टीनें बरीच सुधारणा झाली आहे; परंतु आतां परिस्थिति बदलल्यामुळें संपूर्ण सुधारणा घडवून आणणें व युद्धतयारीचे कार्यक्रम चालू ठेवून नव्यानें उत्पन्न झालेल्या प्रश्नांची तीव्रता कमी करणें हे उद्देश पुढें आले आहेत. नवीन निर्माण झालेले प्रश्न म्हणजे कच्च्या मालाचा तुटवडा व त्यामुळें उत्पादनाला बसणारी मर्यादा हे होत. उपलब्ध होणाऱ्या महत्त्वाच्या कच्च्या मालाची योग्य वांटणी करून निरनिराळ्या देशांत उत्पादनाचा समतोलपणा राखणें या गोष्टीवर भर देणें आवश्यक झालें आहे. आयात कराव्या लागणाऱ्या कच्च्या मालाच्या किंमती वाढल्या आहेत ही आणखी एक अडचण आहे. यामुळें महागाई वाढावयास मदत होऊन व्यापारांत प्रतिकूल तफावतहि येईल व युद्धकार्यासाठीं लागणाऱ्या मालाच्या उत्पादनावर भर द्यावा लागल्यामुळें नागरिक जीवनाच्या वस्तूंचा तुटवडा जाणवेल. या नवीन निर्माण झालेल्या परिस्थितीला पश्चिम युरोपांतील १८ देशांना आतां तोंड द्यावें लागत आहे, व यासाठीं कच्च्या आवश्यक मालाची सर्व देशांत समप्रमाणांत वांटणी व त्याचा जास्तींतजास्त चांगला उपयोग याकडे लक्ष पुरवावें लागत आहे.

## जगांतील टेलिफोन

( १-१-५० रोजींचे आंकडे )

| प्रदेश | एकूण संख्या | जागतिक संख्येशीं प्रमाण % | दर १०० माणसांगणिक प्रमाण |
|---|---|---|---|
| उत्तर अमेरिका | ४,३४,२४,१०० | ६१·८ | २६·५ |
| मध्य अमेरिका | ५,२३,९०० | ०७ | १·० |
| द. अमेरिका | १६,५७,००० | २·४ | १·५ |
| सबंध अमेरिका | ४,५६,०५,००० | ६४·९ | १४·१ |
| युरोप | २,००,००,००० | २८·४ | ३·२ |
| आफ्रिका | ८,०५,६०० | १·१ | ०·४ |
| आशिया | २३,६७,००० | ३·४ | ०·२ |
| ऑस्ट्रेलिया | १५,२२,४०० | २·२ | ११·३ |
| जग | ७,०३,००,००० | १००·० | ३·० |

जगांतील एकूण टेलिफोन्सपैकीं ६१·८% इतके टेलिफोन्स एकट्या उत्तर अमेरिकेंत आहेत, आणि उत्तर अमेरिकेंतील टेलिफोन्सपैकीं ९४% टेलिफोन्स एकट्या युनायटेड स्टेटस्‌मध्यें आहेत. टेलिफोन्सच्या दृष्टीनें दुसरा अनुक्रम ज्या युरोपचा लागतो, त्याच्या आठपट टेलिफोन्स (दर १०० माणसांगणिक) उत्तर अमेरिकेंत आहेत. दक्षिण आणि मध्य अमेरिका ह्यांत मिळून जेवढे टेलिफोन्स आहेत, त्यापेक्षां अधिक टेलिफोन्स एकट्या न्यूयॉर्क शहरांत आहेत. जगांतील एकूण टेलिफोन्सपैकीं ९३% टेलिफोन्स युरोप व अमेरिका खंडें ह्यांत आहेत. आफ्रिकेंतील टेलिफोन्सपैकीं ५२% टेलिफोन्स दक्षिण आफ्रिका युनियनमध्यें आहेत.

आशियांत जगाच्या निम्मी लोकसंख्या आहे. शिकॅगो आणि डेट्रॉइट ह्या दोन अमेरिकन शहरांत मिळून जेवढे टेलिफोन्स आहेत तेवढे सबंद आशिया खंडांतहि नाहींत, आणि आशियांतील टेलिफोन्सपैकीं ७१% टेलिफोन्स एकट्या जपानमध्यें आहेत. भारतांत २,६०० लोकांगणित एक व चीनमध्यें १,८४० लोकांगणिक एक असें टेलिफोन्सचें प्रमाण पडतें. भारतांतील एकूण टेलिफोन्सपैकीं मुंबई व कलकत्ता ह्या दोन शहरांत मिळून ४४% आहेत. चीनमधील सर्व टेलिफोन्सपैकीं एकट्या शांघाईंत ३७% आहेत. थायलँडमधील सर्वच्या सर्व टेलिफोन्स बँककॉकमध्येंच आहेत. १०० लोकवस्तीस किती टेलिफोन्स असा हिशेब आशियापुरता काढला, तर इस्राएल (२·१) व जपान (२·०) हे देश अग्रेसर आहेत.

प्रमुख शहरापुरतां विचार केला, तर न्यूयॉर्कमध्यें २९,५६,८२२ टेलिफोन्स आहेत. ह्यापेक्षां जास्त टेलिफोन्स असणारा (युनायटेड स्टेट्स वगळून) फक्त एकच देश आहे. १८७९ मध्यें न्यूयॉर्कच्या टेलिफोन डिरेक्टरींत फक्त २५२ नांवें होतीं.

---

सहकारी तत्त्वावर खाणीचा प्रयोग—ओरिसांत उत्कल कोऑपरेटिव्ह मिनरल सिंडिकेट ह्या नांवाची एक संस्था नोंदण्यांत आली आहे. ह्या संस्थेचा उद्देश सहकारी तत्त्वावर खाणी चालविण्याचा आहे. अशा प्रकारचा हा पहिलाच प्रयोग असून ओरिसा सरकारचा पाठिंबाहि संस्थेला लाभला आहे.

### शहरांतर्गत दळणवळणाच्या माहितीचें पुस्तक

आधुनिक संस्कृतीला शहरांची संस्कृति असें संबोधण्यांत येतें. व्यापार, उद्योगधंदे, दळणवळणाचीं साधनें, ह्या व इतर बाबींचे केंद्रीकरण झाल्यामुळें शहरांना महत्त्व येणें साहजिकच आहे. मोठमोठ्या शहरांतील दळणवळणहि खूप वाढलेलें असतें. ह्या शहरांतर्गत दळणवळणाची माहिती देणारें एक डॅनिश पुस्तक आहे. सदर पुस्तकाची १९४९ ची आवृत्ति नुकतीच प्रकाशित करण्यांत आली आहे. सर्व जगांतील ४८ निरनिराळ्या शहरांच्या अंतर्गत दळणवळणाची आंकडेवार माहिती पुस्तकांत देण्यांत आली आहे. पुस्तकाचें नांव 'वर्ल्डस् सिटी ट्रॅफिक' असें आहे. पुस्तकांत निर्देश केलेल्या ४८ शहरांत मिळून ८० लाख मोटारी आहेत. त्यांपैकीं ८,४३,३४७ डेट्रॉइट ह्या अमेरिकेंतील शहरांत आहेत. डेट्रॉइट शहरांतील प्रत्येक दोन माणसांमागें एक मोटार असें प्रमाण पडतें. त्यानंतर लॉस एंजल्स, मिलवॉकी, क्लिव्हलंड, टोरोंटो, सॅन फ्रॅंसिस्को व मेलबोर्न ह्या शहरांचे अनक्रम लागतात. अमेरिकन शहरांच्या खालोखाल युरोपमधील शहरांत मोटारी आढळून येतात. त्यांतहि ब्रिटनमध्यें अधिक मोटारी आहेत. पॅरिसमध्यें दर हजार माणसांमागें ६९ मोटारी आहेत. हॉलंडमध्यें दर हजार माणसांमागें फक्त २९ मोटारी आढळून येतात. मुंबईत नागरिकांच्या प्रमाणानें सर्वांत कमी मोटारी आढळतात. मुंबईची वस्ती सुमारे ४० लाख आहे, आणि मोटारींची संख्या फक्त ३६,००० आहे. हें प्रमाण १,००० नागरिकांमागें ९ मोटारी असें पडतें. ह्या ४८ शहरांत मिळून १९४९ सालीं झालेल्या अपघातांत ६,४८८ लोक दगावले आणि २,८७,४९६ लोक जायबंदी झाले. मेलबोर्न (ऑस्ट्रेलिया) शहरांत अपघाती मृत्यूंचें प्रमाण सर्वांत अधिक आढळून येतें. १,००,००० नागरिकांमागें ३४·५५ अपघाती मृत्यू ह्या शहरांत होतात. कलकत्ता शहरांत अपघाती मृत्यूचें प्रमाण सर्वांत कमी आहे. दर १,००,००० नागरिकांमागें १·९३ अपघाती मृत्यू होतात. इतर कांहीं शहरांतून १,००,००० नागरिकांमागें सुमारे १० मृत्यू होतात, असें नमूद करण्यांत आलें आहे.

---

### मुधोळ स्टेट बँकेचें अर्बन बँकेंत रूपांतर

मुधोळ स्टेट बँकेच्या शेअरहोल्डर्सची बैठक होऊन स्टेट बँकेचें अर्बन बँकेंत रूपांतर झालें.

---

### डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्स, पुणें

एप्रिल, १९५१ मध्यें झालेल्या "गव्हर्मेंट कमर्शिअल डिप्लोमा" परीक्षेंतील यशस्वी उमेदवार.

**पहिला वर्ग:**—वैद्य रा. घों.

**दुसरा वर्ग.**—देशपांडे श्री. ना., गोखले प. वि., गुलुंजकर द. कृ., कोलते म. तु., कुलकर्णी त्र्यं. ल., मराठे र. भि., नेरकर म. पु., शेंदरे इ. अ., उपाध्ये म. जे.

**पास वर्ग:**—भालेराव भा. मु., गुजराथी कु. ग., गोवईकर ज. प., हेबळी अ. गु., जोशी का. ग., कपाडिया कि. मी., म्हैसकर क. गो., मोदी छो. न., राजेशिर्के य. म., शिरगांवकर नि. रा., शिंगडे भा. सुं.

एस्. एच्. खुपकर
सेक्रेटरी,
डे. इं. ऑफ कॉमर्स.

**पाकिस्तानचा आगपेट्यांचा कारखाना**—लाहोरजवळ शहादरा येथें पाकिस्तानांतील एकुलता एक आगपेट्यांचा कारखाना आहे. आयात होणाऱ्या आगपेट्यांच्या स्पर्धेविरुद्ध कारखान्याला संरक्षण देण्यांत यावें अशी मागणी करण्यांत आली होती. ती पाकिस्तान सरकारनें मान्य न केल्यामुळें कारखाना बंद ठेवण्याचें ठरलें आणि त्यांत काम करणाऱ्या ४०० नोकरांना कामावरून काढण्यांत आलें.

**वाटुमल निबंध स्पर्धा**—'भारतांतील संततीचें नियमन आणि अन्नपुरवठा' ह्या विषयावरील निबंधासाठीं १० बक्षिसें वाटुमल फौंडेशन ह्या संस्थेनें ठेवलीं आहेत. बक्षिसांची एकूण रक्कम ५,००० रुपये आहे. पहिलें बक्षिस २,००० रुपयांचें आहे. निबंध जे. वाटुमल, किशोर, काळबादेवी रोड, मुंबई नं. २ ह्यांचेकडे पाठवावयाचे आहेत.


श्री.

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड पुणें २.

'स्वे स्वे कर्मण्यभिरतः
संसिद्धिं लभते नरः ॥'

श्रीमत् भगवद्गीता.

## यश मिळालें.

आतां कायम भांडवल म्हणजे शेअर विक्री सुरू आहे.

साखर विक्रींतून ठेवींच्या रकमा मुदतीप्रमाणें
कंपनी परत करीत आहे.

फॉर्म व माहितीसाठीं लिहा.

कॉमनवेल्थ बिल्डिंग,
९८० सदाशिव पेठ,
लक्ष्मी रोड, पुणें २.
ता. १ जुलै १९५१.

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
बी. ए., एलएल. बी.
सी. जी. आगाशे ॲण्ड को.,
मॅनेजिंग एजंट्स.

—सर्व प्रांतांतील—
सुती-गरम-रेशमी
—खादीचें माहेरघर—

खादी मन्दिर

३६१, बुधवार पेठ,
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २.

## १९५० सालांतील सोनें व डॉलर्स यांबद्दलची परिस्थिति

अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्ह सिस्टिमच्या ताज्या अहवालांत असा उल्लेख आहे कीं परकी देशांचा सुवर्ण व अमेरिकन डॉलर्स यांचा सांठा १९५० साली हळू हळू वाढत होता, दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळांत असा अनुभव प्रथमच आला. ही वाढ होण्याचीं कारणें म्हणजे अमेरिकेकडून खाजगी भांडवलाची निर्यात, अमेरिकन सरकारकडून निरनिराळ्या देशांना मिळणारी पैशाची मदत व अमेरिकेच्या व्यापाराच्या अनुकूल तफावतीचें उतरतें प्रमाण, या गोष्टी असल्या पाहिजेत. गेल्या एका वर्षांत सुवर्ण व डॉलर्स यांची वाढ ३७ महापद्म डॉलर्सनीं होऊन वर्षअखेर एकूण शिल्लक २९ महापद्म डॉलर्स इतकी झाली. महायुद्धानंतरच्या कालांतील ही सर्वांत जास्त शिल्लक आहे. परंतु १९४५ साली शिलकीचा आंकडा २०·८ महापद्म डॉलर्स इतका होता. बेल्जम, नॉर्वे व व्हेनिझुएला या देशांव्यतिरिक्त इतर सर्व देशांत ही वाढ दिसून आली. एकूण वाढीपैकीं दोन-तृतीयांश वाढ ग्रेट ब्रिटन व कॅनडा या देशांत झाली. ग्रेट ब्रिटननें एका वर्षांत व्यापारी व्यवहारांत मिळालेल्या एक महापद्म डॉलर्सचें सोन्यांत रूपांतर केलें व इतर मार्गांनींहि कांहीं सोनें मिळविलें. युरोपियन देशांची परिस्थिति आतां सुधारत असून सोनें व डॉलर्स यांच्या संचयाला आतां शिल्लक या नात्यानें महत्त्व प्राप्त होत आहे. यापूर्वी तीन-चार वर्षें सोनें व डॉलर्स यांना महत्त्व व्यापारी व्यवहाराच्या दृष्टीनें खरेदीसाठी होतें.

---

## मिरी, लेमन ग्रास ऑईल व काजूबिया यांच्या निर्गतीचें डॉलर्स मिळवून देण्याच्या दृष्टीनें महत्त्व

डॉलर्स मिळविण्याच्या दृष्टीनें चहा, मँगॅनीज, कच्चीं कातडीं, यांना विशेष महत्त्व आहे. कारण, कोट्यावधी रुपये यामुळें मिळूं शकतात. परंतु अलिकडच्या परिस्थितीमुळें विशेषतः मिऱ्यांच्या व्यापाराला फार महत्त्व प्राप्त झालें आहे. फेब्रुवारी अखेरच्या अकरा महिन्यांत १७॥ कोटी रुपये किंमतीच्या मिऱ्यांची निर्गत अमेरिकेकडे झाली. सरकारला ३ कोटी, ५२ लक्ष रुपये निर्गतीवरील करामुळें मिळाले ते निराळेंच. त्याचप्रमाणें लेमन ग्रास ऑईलची फेब्रुवारी अखेरच्या अकरा महिन्यांत सुमारें १ कोटी, २० लक्ष रु. किंमतीची निर्गत झाली. या तेलापासून सिंथेटिक व्हिटॅमिन ए निघूं शकतें म्हणून निर्गत वाढली. काजूबियांची निर्गत गेलीं कित्येक वर्षें अमेरिकेकडे होत असून गेल्या एका वर्षांतील निर्गतीची किंमत ५ कोटी रुपये आहे. परंतु ही निर्गत आफ्रिकेकडून आयात होणाऱ्या काजूबियांमुळें शक्य होतें, व कच्च्या काजूबियांचा निम्मा पुरवठा आफ्रिकेकडून हिंदला होतो. काजूबिया फोडून त्या निर्गत माल म्हणून अमेरिकेकडे पाठविल्या जातात. काजूबियांचा खप इतर युरोपांतील देशांत वाढवावयाला अवसर आहे. मिऱ्यांच्या व्यापाराची तेजी इतर देशांतील कमी उत्पन्न, अमेरिकेचें कोरियन युद्धानंतरचें साठेबाजीचें धोरण, व मालाच्या वाढत्या किंमती यांमुळें शक्य झाली आहे. तरीपण या किरकोळ वस्तूंचें निर्गत व्यापाराच्या दृष्टीनें महत्त्व वरील आंकड्यांवरून दिसून येतें.

---


फोनः ३७५१९ तारः SAHYOG

**दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.**

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई १.

उत्पादकांच्या ( प्रोड्यूसर्स ) सोसायट्यांना असोसिएशन खालील मालाचा पुरवठा करतेः—

सूत, रसायनें, रंग, कच्चीं कातडीं व चामडीं, कातडीं कमाविण्यास लागणारा माल, कमावलेलें कातडें, इ., मशीन-टूल्स आणि इक्विपमेंट इ.

आणि

खालील मालाच्या विक्रीस साहाय्य करतेः—

हातमागावरील कापड ( सुती व लोंकरी ), धातूचें सामान, चंदनी लांकूड, रोजवुड आणि हस्तिदंती आर्टस् अँड क्रॅफ्टस्, रेशीम, जर, कातडीं व कातडी माल, खाद्य तेलें, लाकूड आणि कोळसा वगैरे.



**दि रत्नाकर बँक, लि.**

( कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली )

स्थापना : १९४३

मुख्य कचेरीः भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

शाखा—सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | २०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ५,०३,००० |
| रिझर्व्ह फंड | ... | ५१,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४७,६६,००० |

—अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील सांगली, चेअरमन

श्री. गंगाराम सिद्दाप्पा चौगुले, कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा, B. Com., C. A. I. I. B., मॅनेजर


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं ' दुर्गाधिवास ', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.